दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

### आजचे पंचांग

दिनांक : २९ जून २०२६ वार : सोमवार माह (अमावस्यांत) : ज्येष्ठ माह (पूर्णिमांत) : ज्येष्ठ ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : शुक्ल पक्ष तिथी : पौर्णिमा तिथी (३० जून पहाटे ०५:२५ पर्यंत) त्यानंतर प्रथम तिथी नक्षत्र : मूळ नक्षत्र (३० जून पहाटे ०४:०३ पर्यंत) त्यानंतर पूर्वाषाढा नक्षत्र योग : शुक्ल योग (दुपारी ०२:२५ पर्यंत) त्यानंतर ब्रह्म योग करण : विस्ती भद्रा करण (सायंकाळी ०४:१६ पर्यंत)

### पालखी मार्गावरील कामाला गती

पुणे : श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गावर रखडलेल्या कामांना गती मिळाली आहे. स्थानिकांनी विरोध केल्याने बारामती ते इंदापूरदरम्यानच्या चार गावांजवळ रस्त्याचे काम रखडले होते. मात्र त्यांची समजूत काढण्यात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला यश आले असून उर्वरित कामे वेगाने पूर्ण केली जात आहेत. पालखी येण्यापूर्वी या रस्त्यावरील डांबरीकरण पूर्ण झाले असेल, परिणामी वारकऱ्यांची मोठी सोय होणार आहे.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 सोमवार, दि. २९ जून २०२६ वर्ष - १ अंक - २७४ पाने - ४ पुणे/पिंपरी-चिंचवड

# पर्सिस्टंट सिस्टीम्सकडून जर्मन कंपनी नगारो एसईचे संभाव्य अधिग्रहण

## भारतीय आयटी क्षेत्रातील महत्त्वपूर्ण जागतिक विस्तार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे मुख्यालय असलेल्या आणि भारतातील आघाडीच्या आयटी सेवा कंपनींपैकी एक असलेल्या **Persistent Systems** ने जर्मनीतील म्युनिक येथील डिजिटल इंजिनिअरिंग क्षेत्रातील कंपनी **Nagarro SE** चे अधिग्रहण करण्याचा प्रस्ताव जाहीर केला आहे. हा व्यवहार भारतीय आयटी उद्योगातील परदेशातील सर्वात मोठ्या धोरणात्मक व्यवहारांपैकी एक मानला जात असून, यामुळे भारतीय आयटी कंपन्यांच्या जागतिक विस्ताराला नवी दिशा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, **€81** प्रति शेअर रोख **(all-cash offer)** या दराने नगारोचे सर्व शेअर्स खरेदी करण्याचा प्रस्ताव देण्यात आला आहे. हा दर नगारोच्या मागील बाजारभावाच्या तुलनेत सुमारे १४० टक्के प्रीमियम दर्शवतो. या व्यवहारामुळे दोन्ही कंपन्यांचा मिळून सुमारे २.९ अब्ज वार्षिक उत्पन्न क्षमतेचा समूह तयार होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

**जागतिक विस्ताराचा टप्पा**

या प्रस्तावित अधिग्रहणानंतर तयार होणाऱ्या संयुक्त समूहाची उपस्थिती ४० हून अधिक देशांमध्ये असेल आणि सुमारे ४६,००० कर्मचारी या संस्थांमध्ये कार्यरत असतील. नगारोचे युरोपमधील मजबूत अस्तित्व आणि पर्सिस्टंटची उत्तर अमेरिका व भारतातील क्षमता एकत्र आल्यास जागतिक स्तरावर डिजिटल इंजिनिअरिंग सेवांमध्ये स्पर्धात्मक स्थान अधिक मजबूत होऊ शकते, असे उद्योग विश्लेषकांचे मत आहे.

> **दीर्घकालीन दृष्टीने, या व्यवहारामुळे**
> - ✻ जागतिक ग्राहक आधार वाढू शकतो
> - ✻ युरोपियन बाजारपेठेत उपस्थिती मजबूत होऊ शकते
> - ✻ डिजिटल इंजिनिअरिंग आणि AI सेवांमध्ये क्षमता वाढू शकते

> **आव्हाने आणि जोखीम**
> - ✻ विविध देशांतील कंपन्यांचे समाकलन (integration)
> - ✻ सांस्कृतिक व कार्यपद्धतीतील फरक
> - ✻ नियामक मंजुरीची प्रक्रिया
> - ✻ आर्थिक खर्च व नफ्यावरील संभाव्य दबाव

तज्ज्ञांच्या मते, हा व्यवहार पूर्ण झाल्यास पर्सिस्टंटसाठी युरोपियन बाजारपेठेत महत्त्वपूर्ण प्रवेश (strategic expansion) ठरू शकतो. मात्र, या प्रक्रियेतील यश हे पूर्णतः अंमलबजावणी, समाकलन (integration) आणि नियामक मंजुरींवर अवलंबून असेल.

**व्यवहाराचे स्वरूप व प्रक्रिया**

हा व्यवहार **Galaxy Germany Holding SE** या पर्सिस्टंटच्या उपकंपनीमार्फत प्रस्तावित करण्यात आला आहे. नगारोच्या व्यवस्थापन मंडळाने या प्रस्तावाला पाठिंबा दिला असून भागधारकांकडून त्यावर अंतिम निर्णय अपेक्षित आहे.

हा प्रस्ताव पूर्ण होण्यासाठी आवश्यक ५०% पेक्षा जास्त भागधारकांची मान्यता तसेच जर्मन वित्तीय नियामक संस्था **BaFin** आणि इतर संबंधित प्राधिकरणांची मंजुरी आवश्यक आहे. नियामक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच व्यवहाराची अंतिम अंमलबजावणी होणार आहे, असे कंपनीकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**आर्थिक परिणाम व बाजार अपेक्षा**

बाजारातील विश्लेषकांच्या मते, अशा मोठ्या आंतरराष्ट्रीय व्यवहारांमुळे अल्पावधीत शेअर बाजारात अस्थिरता (ींश्रीरींळश्रळीूं) दिसू शकते. मोठ्या प्रमाणातील गुंतवणूक, संभाव्य कर्जभार आणि रोख प्रवाह व्यवस्थापन याबाबत गुंतवणूकदार सावध भूमिका घेण्याची शक्यता आहे.

तज्ज्ञांचे मत आहे की अशा व्यवहारांमध्ये दीर्घकालीन यश हे केवळ आर्थिक क्षमतेवर नाही तर व्यवस्थापन कौशल्य, कर्मचारी समन्वय आणि ग्राहक सेवा सातत्यावर अवलंबून असते.

**निष्कर्ष :** पुण्यातील **Persistent Systems** कडून सादर करण्यात आलेला हा प्रस्ताव भारतीय आयटी उद्योगाच्या जागतिक विस्ताराच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. मात्र, हा व्यवहार अद्याप अंतिम नसून तो नियामक मंजुरी, भागधारकांचा निर्णय आणि अंमलबजावणीच्या टप्प्यांवर अवलंबून आहे.

एकूणच, हा प्रस्ताव भारतीय आयटी क्षेत्राच्या जागतिक स्पर्धात्मकतेत वाढ करण्याची क्षमता ठेवतो, मात्र त्याचे यश पारदर्शकता, प्रभावी व्यवस्थापन आणि नियोजनावर अवलंबून असेल.

## सारांश वृत्त

### 'सत्यमेव जयते फार्मर कप'चा उद्या शुभारंभ; २५ हजारांहून अधिक शेतकरी गट सहभागी, प्रत्यक्ष लाभावर प्रश्नचिन्ह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** पानी फाउंडेशनच्या 'सत्यमेव जयते फार्मर कप २०२६' स्पर्धेचा शुभारंभ सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. शासनाच्या माहितीनुसार राज्यातील २५,८२३ शेतकरी गट या उपक्रमात सहभागी झाले असून गटशेती, उत्पादनवाढ आणि खर्च कमी करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले आहे.

मात्र, शेतकरी संघटनांकडून अशा उपक्रमांमुळे प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या उत्पन्नात किती वाढ झाली, कर्जबाजारीपणा कमी झाला का आणि बाजारभाव, सिंचन व हमीभाव यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर काय उपाय झाले, याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. त्यामुळे स्पर्धा आणि प्रशिक्षणाबरोबरच शेतकऱ्यांना प्रत्यक्ष आर्थिक दिलासा व शाश्वत धोरणांची अंमलबजावणी कितपत होते, याकडे लक्ष लागले आहे.

### इंडियन डेंटल असोसिएशनने शासनाशी सहकार्य वाढवावे – डॉ. राजेश गवांदे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्राला दंत पर्यटन आणि दंत आरोग्य क्षेत्रातील जागतिक केंद्र बनविण्याची क्षमता असून, इंडियन डेंटल असोसिएशनने शासनाशी सहकार्य वाढवावे, असे आवाहन डॉ. राजेश गवांदे यांनी केले. मुंबईत झालेल्या परिषदेत महाराष्ट्र शासन आणि इंडियन डेंटल असोसिएशन यांच्यात दंत पर्यटनासंदर्भात सामंजस्य करार **(MoU)** करण्यात आला.

# शिक्षणमंत्री दादा भुसेंच्या विरोधात वंचित आक्रमक

## तात्काळ राजीनामा देण्याची मागणी, सुजात आंबेडकर मैदानात!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** देशभरात नीट पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान झाले असताना, आता महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा **(TET)** पेपरफुटीची घटना समोर आल्याने राज्यातील परीक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे नेते सुजात आंबेडकर यांनी राज्य सरकारवर तीव्र टीका करत शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी केली आहे. चाळीसगाव येथे आयोजित बहुजन संवाद महासभेत ते बोलत होते.

यावेळी सुजात आंबेडकर म्हणाले की, देशभरात नीट पेपर फुटीमुळे आधीच लाखो विद्यार्थ्यांचे मानसिक, शैक्षणिक आणि आर्थिक नुकसान झाले आहे. त्यातून विद्यार्थी आणि पालक अजूनही सावरलेले नसतानाच महाराष्ट्रातील **TET** परीक्षेचाही पेपर फुटल्याची घटना घडली. या परीक्षेसाठी सुमारे ६ लाख विद्यार्थी बसणार होते. अनेक विद्यार्थ्यांनी वर्षानुवर्षे अभ्यास करून, आर्थिक अडचणींवर मात करत या परीक्षेची तयारी केली होती. मात्र पेपरफुटीमुळे त्यांच्या मेहनतीवर पाणी फेरले गेले आहे.

ते पुढे म्हणाले की, पेपरफुटी ही केवळ प्रशासकीय चूक नसून विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणारा गंभीर गुन्हा आहे. वारंवार होणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांचा परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास उडत चालला आहे. सरकार प्रत्येक वेळी चौकशी आणि कारवाईची घोषणा करते; मात्र अशा घटना थांबत नसल्याने प्रशासनाचे अपयश स्पष्ट होत आहे.

''जेव्हा एखाद्या परीक्षेचा पेपर फुटतो, तेव्हा केवळ प्रश्नपत्रिका फुटत नाही, तर लाखो विद्यार्थ्यांची स्वप्ने, त्यांची मेहनत आणि त्यांच्या कुटुंबाच्या अपेक्षाही उद्ध्वस्त होतात. त्यामुळे या गंभीर घटनेची जबाबदारी स्वीकारून राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा,'' अशी मागणी सुजात आंबेडकर यांनी केली. यावेळी बहुजन संवाद महासभेला मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

**दोषींवर कठोर कारवाई करणार**

टीईटी पेपरफुटीची घटना घडल्याने ही परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. या प्रकरणाची राज्य शासनाने गंभीर दखल घेतली असून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिली आहे.

# राजगड सहलीवर काळाचा घाला! पाबे घाटात ट्रॅव्हल बस ४० फूट दरीत; दोन ठार, १९ जण जखमी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वेल्हे,(पुणे) :** राजगड किल्ला पाहण्यासाठी मुंबईहून निघालेल्या पर्यटकांच्या खाजगी बसचा (ट्रॅव्हलचा) राजगड तालुक्यातील पाबे घाटात भीषण अपघात झाला असून यामध्ये दोन जणांचा मृत्यू तर १९ जण जखमी झाल्याची घटना रविवार (ता. २८) जून रोजी पहाटे एक वाजण्याच्या सुमारास घडली. या दुर्घटनेमध्ये विश्वास बाबुराव सातिम (वय २५.वर्ष)राहणार विलेपार्ले, मुंबई व ध्वनी चंद्रेश ठक्कर (वय.२३ वर्ष)राहणार कांदिवली, मुंबई या दोघांचा मृत्यू झाला असून ट्रॅव्हल बसच्या ड्रायव्हर सह १८ जण गंभीर जखमी झाले असून काही जणांवर वेल्हे ग्रामीण रुग्णालयात तर पुण्यातील खाजगी रुग्णालयात त काही जणांवर उपचार सुरू असल्याची माहिती वेल्हे पोलिसांनी दिली.

वेल्हे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मुंबईतील एक खाजगी कंपनीतील २० जणांचा ग्रुप खाजगी ट्रॅव्हल क्रमांक एमएच- ४७- ए .एस. ०९३४ या बसमधून किल्ला राजगड पाहण्यासाठी येत असताना पाबे घाट उतरताना गावाच्या जवळ असलेल्या वळणावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने बसने रस्त्यावरील संरक्षण कठडा तोडत सुमारे ३० ते ४० फूट दरीत कोसळली. या दुर्घटनेमध्ये बसमधील दोघांचा मृत्यू झाला असून १८ जण जखमी आहेत. यामध्ये खाजगी बसचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच वेल्हे पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर शेवते यांच्या मार्गदर्शनाखाली गोपनीय विभागाचे कर्मचारी आकाश पाटील ,निलेश राणे, पंकज मोघे, यांच्यासह राजगड व हवेली आपत्ती व्यवस्थापन टीमचे सदस्य तानाजी भोसले, गणेश सपकाळ ,संदीप सोळसकर, कृष्णा मरगळे यांनी घटनास्थळी धाव घेतली व तातडीने बचाव कार्य सुरू करण्यात आले बसच्या खाली अडकलेल्या ड्रायव्हर तसेच इतर पर्यटकांना बाहेर काढत प्राथमिक उपचारासाठी वेल्हे येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# भारताने बांगलादेशी नागरिकांसाठी पर्यटन व्हिसा पुन्हा सुरू केल्याने दोन्ही देशांतील दुरावा कमी होण्यास मदत होऊ शकते

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारताने बांगलादेशी नागरिकांसाठी पर्यटन व्हिसा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे भारत-बांगलादेश संबंध सुधारण्यास सकारात्मक चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




पर्यटन व्हिसा पुन्हा सुरू झाल्याने दोन्ही देशांतील नागरिकांना प्रवास करणे सोपे होईल. कुटुंबीयांच्या भेटीगाठी, पर्यटन, वैद्यकीय उपचार आणि व्यावसायिक प्रवासालाही याचा फायदा होण्याची शक्यता आहे.

तज्ज्ञांच्या मते, हा निर्णय दोन्ही देशांमधील विश्वास आणि लोकांमधील संपर्क वाढवण्यासाठी महत्त्वाचे पाऊल ठरू शकतो. मात्र, सीमा व्यवस्थापन, व्यापार, पाणी वाटप आणि इतर द्विपक्षीय प्रश्नांवर सातत्याने संवाद आणि सहकार्य आवश्यक असल्याचेही ते सांगतात.

एकूणच, पर्यटन व्हिसा पुन्हा सुरू करणे हा भारत-बांगलादेश संबंध सुधारण्याच्या दिशेने सकारात्मक संकेत मानला जात असला, तरी दीर्घकालीन सुधारणा व्यापक राजनैतिक प्रयत्नांवर अवलंबून राहतील.

# १ जुलैला राज्यस्तरीय कृषी पुरस्कार वितरण; १८९ शेतकरी, संस्था आणि कृषी अधिकारी-कर्मचाऱ्यांचा होणार सन्मान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** हरित क्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या कृषी दिनाचे औचित्य साधून राज्य शासनाच्या कृषी विभागातर्फे १ जुलै २०२६ रोजी मुंबईतील वरळी येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियमच्या डोममध्ये राज्यस्तरीय कृषी पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात सन २०२३ आणि २०२४ या वर्षांतील राज्यस्तरीय कृषी पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार असून एकूण १८९ पुरस्कारार्थ्यांचा गौरव केला जाणार असल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण होणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच राज्य मंत्रिमंडळातील अनेक मंत्री आणि मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.




राज्यात आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार, उत्पादनवाढ, शाश्वत आणि सेंद्रिय शेती, फलोत्पादन तसेच कृषी विस्तार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे शेतकरी, संस्था आणि कृषी अधिकारी-कर्मचाऱ्यांचा या सोहळ्यात सन्मान करण्यात येणार आहे.

यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार, वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार, जिजामाता कृषिभूषण पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार, युवा शेतकरी पुरस्कार, उद्यानपंडित पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार तसेच पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार यांसह विविध पुरस्कारांचा समावेश आहे.

# पालघरच्या विकासाचा दावा; पण महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपुढे पर्यावरण, विस्थापन आणि अंमलबजावणीची मोठी आव्हाने

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पालघर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदर, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन, प्रस्तावित वाढवण आंतरराष्ट्रीय विमानतळ, नारिंगी खाडी पूल आणि उत्तन-विरार सागरी सेतू या बहुचर्चित प्रकल्पांची पाहणी करत विकासकामांचा आढावा घेतला. राज्य सरकारच्या मते हे प्रकल्प पालघरसह महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला चालना देणारे आणि रोजगारनिर्मिती करणारे ठरणार आहेत. मात्र, या प्रकल्पांमुळे निर्माण होणारे पर्यावरणीय परिणाम, स्थानिकांचे विस्थापन, मच्छीमारांच्या उपजीविकेवर होणारा परिणाम आणि प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील विलंब हे प्रश्न अद्याप कायम आहेत.

मुख्यमंत्र्यांनी वाढवण बंदराच्या कामाचा आढावा घेताना भूसंपादन, वन मंजुरी, रेल्वे व रस्ते जोडणी, वीज, पाणीपुरवठा आणि मच्छीमारांच्या नुकसानभरपाइ 'संदर्भातील कामांचा आढावा घेतला. सुमारे ७६ हजार कोटींहून अधिक खर्चाच्या या बंदराला देशातील सर्वात मोठ्या खोल समुद्री बंदरांपैकी एक म्हणून विकसित करण्याचे नियोजन आहे. सरकारच्या मते या प्रकल्पामुळे व्यापार, निर्यात आणि रोजगाराला मोठी चालना मिळेल.

परंतु वाढवण बंदराला सुरुवातीपासूनच स्थानिक ग्रामस्थ, मच्छीमार आणि पर्यावरणवादी संघटनांचा विरोध आहे. समुद्री जैवविविधता, मासेमारी व्यवसायावर होणारा परिणाम, किनारपट्टीतील बदल आणि हजारो कुटुंबांच्या पुनर्वसनाबाबत अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. शासनाने नुकसानभरपाई आणि पुनर्वसनाची हमी दिली असली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी कशी होणार, याबाबत स्थानिकांमध्ये अद्याप साशंकता आहे.

याच दौऱ्यात मुख्यमंत्र्यांनी मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पातील बोईसर स्थानकाच्या




कामाची पाहणी केली. हा देशातील महत्त्वाकांक्षी प्रकल्प असला तरी भूसंपादन, वाढलेला खर्च आणि वेळापत्रकातील बदल यामुळे तो अनेकदा चर्चेत राहिला आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर प्रवासाचा वेळ कमी होईल, असा सरकारचा दावा आहे; मात्र या प्रकल्पाचा सर्वसामान्य नागरिकांना किती प्रत्यक्ष फायदा होणार, यावर तज्ज्ञांकडून प्रश्न उपस्थित केले जातात.

प्रस्तावित वाढवण आंतरराष्ट्रीय विमानतळाचाही मुख्यमंत्र्यांनी आढावा घेतला. बंदर, बुलेट ट्रेन आणि महामार्गाशी जोडलेला हा विमानतळ भविष्यात लॉजिस्टिक हब म्हणून विकसित होईल, असा सरकारचा विश्वास आहे. मात्र राज्यात आधीच मुंबई आणि नवी मुंबई विमानतळ उपलब्ध असताना आणखी एका विमानतळाची आर्थिक व्यवहार्यता आणि पर्यावरणीय परिणाम यावर चर्चा सुरू आहे.

नारिंगी खाडी पूल आणि उत्तन-विरार सागरी सेतू या प्रकल्पांमुळे प्रवासाचा वेळ कमी होईल आणि वाहतूक सुलभ होईल, असा दावा सरकारकडून करण्यात आला आहे. मात्र राज्यातील अनेक मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांना खर्चवाढ, मुदतवाढ आणि कंत्राटी अडचणींचा सामना करावा लागल्याचा अनुभव आहे. त्यामुळे या प्रकल्पांचेही काम नियोजित वेळेत पूर्ण होईल का, हा प्रश्न कायम आहे.

विशेष म्हणजे, या सर्व प्रकल्पांच्या घोषणांमध्ये रोजगारनिर्मितीचा उल्लेख केला जात असला तरी स्थानिक युवकांना किती रोजगार मिळणार, कौशल्य प्रशिक्षणाची अंमलबजावणी कशी होणार आणि रोजगाराची हमी काय असेल, याबाबत अद्याप स्पष्ट आराखडा सार्वजनिक झालेला नाही.

## संपादकीय

### एअर इंडिया बिल्डिंग, नरिमन पॉइंट : विकासाच्या नावाखाली वारशाची शांत विक्री?

मुंबईतील नरिमन पॉइंट येथील प्रतिष्ठित एअर इंडिया बिल्डिंग महाराष्ट्र शासनाने सुमारे १,६०१ कोटींना ताब्यात घेतल्यानंतर केवळ एक स्थावर मालमत्ता हस्तांतरण झालेले नाही, तर शहराच्या ऐतिहासिक स्मृतींच्या संरचनेत एक गंभीर बदल घडून आला आहे. हा व्यवहार केवळ प्रशासनिक सोयीसाठी आहे की विकासाच्या नावाखाली वारसा संपवण्याचा आणखी एक टप्पा हा प्रश्न आता अधिक तीव्रतेने समोर येत आहे.

१९७० च्या दशकात उभारलेली ही २३ मजली इमारत केवळ कॉर्पोरेट कार्यालय नव्हती, तर भारताच्या नागरी विमानसेवेच्या गौरवशाली काळाचे प्रतीक होती. एअर इंडिया, जी एकेकाळी देशाच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेचा अभिमान मानली जात होती, तिचे मुख्यालय या इमारतीतून चालत होते. त्या काळात एअर इंडिया केवळ विमान कंपनी नव्हती, तर भारतीय आधुनिकतेचे उड्डाण मानले जाणारे एक सांस्कृतिक प्रतीक होते. आज त्याच प्रतीकाचा ताबा बदलणे हे केवळ प्रशासकीय हस्तांतरण नसून स्मृतींच्या स्तरावर घडणारा एक मौन भूकंप आहे.

राज्य सरकारचा युक्तिवाद साधा आहेमंत्रालय परिसरातील प्रचंड गर्दी कमी करणे, विविध शासकीय विभागांना एकत्र आणणे आणि कार्यक्षम प्रशासन निर्माण करणे. हे उद्दिष्ट तात्त्विकदृष्ट्या योग्य असले तरी प्रश्न असा आहे की, मुंबईसारख्या शहरात प्रत्येक रिकामी किंवा मोक्याची इमारत केवळ प्रशासकीय वापरासाठीच का पाहिली जाते? शहराचा ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि स्थापत्य वारसा हा केवळ उपयोगितेच्या चष्म्यातूनच मोजायचा का?

नरिमन पॉइंट हा परिसर मुंबईच्या आधुनिक आर्थिक इतिहासाचा केंद्रबिंदू आहे. येथे उभ्या असलेल्या प्रत्येक इमारतीमध्ये एका काळाचा आर्थिक आत्मविश्वास दडलेला आहे. अशा ठिकाणी एअर इंडिया बिल्डिंगचे अस्तित्व हे केवळ जागेचा वापर नव्हते, तर एका राष्ट्रीय संस्थेच्या प्रतिष्ठेचे प्रतीक होते. आता त्या प्रतीकाचा अंतर्गत उपयोग कार्यालयीन विस्तार म्हणून होणे ही प्रक्रिया किती अपरिहार्य आहे, यावर गंभीर प्रश्न उपस्थित होतात.

इमारत ताब्यात घेतल्यानंतर एअर इंडियाचे लोगो, चिन्हे आणि ओळखचिन्हे काढून टाकण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. हे दृश्य अनेकांसाठी केवळ प्रशासनिक बदल नसून भावनिक आणि ऐतिहासिक विस्थापन आहे. कारण हे चिन्ह केवळ कंपनीचे नव्हते, तर भारताच्या विमानसेवेच्या सुवर्णकाळाचे प्रतिनिधित्व करत होते.

या संपूर्ण प्रक्रियेत सर्वात मोठा मुद्दा म्हणजे वारसा व्यवस्थापनाचा अभाव. मुंबईत विकास योजनांचा वेग प्रचंड आहे, परंतु ऐतिहासिक इमारतींचे जतन, पुनर्वापर आणि संवर्धन यासाठी ठोस आणि संवेदनशील धोरणाचा अभाव सातत्याने जाणवतो. एखादी इमारत जुनी झाली की तिच्या ऐतिहासिक मूल्याऐवजी तिच्या उपयुक्ततेचा विचार केला जातो, आणि तेथूनच वारशाची हळूहळू गळती सुरू होते.

एअर इंडिया बिल्डिंगच्या बाबतीतही हेच चित्र दिसते. तिची रचना, स्थान आणि ऐतिहासिक संदर्भ हे तिला केवळ एक मालमत्ता न बनवता शहराच्या ओळखीचा भाग बनवतात. मात्र या ओळखीचा विचार निर्णय प्रक्रियेत किती झाला, हा प्रश्न अनुत्तरित राहतो.

सरकारी पातळीवर या इमारतीचा उपयोग मंत्रालयातील कार्यालयीन ताण कमी करण्यासाठी केला जाईल, असे सांगितले जाते. पण हा तात्पुरता उपाय दीर्घकालीन शहरी नियोजनाच्या दृष्टीने कितपत योग्य आहे, हे स्पष्ट नाही. मुंबईसारख्या शहरात समस्या ही जागेच्या अभावाची नसून, नियोजनाच्या विस्कळीततेची आहे.

एकीकडे खासगीकरण, दुसरीकडे सार्वजनिक मालमत्तेचे पुनर्वाटपया दोन्ही प्रक्रियांमध्ये सामान्यतः आर्थिक आणि प्रशासकीय लाभ पुढे ठेवले जातात, तर सांस्कृतिक स्मृती मागे राहतात. एअर इंडिया बिल्डिंगचा व्यवहारही याच चौकटीत बसतो का, हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

या संपूर्ण घडामोडीमध्ये सर्वात चिंताजनक बाब म्हणजे सार्वजनिक चर्चेचा अभाव. अशा महत्त्वाच्या ऐतिहासिक इमारतींच्या भवितव्यावर निर्णय घेताना नागरिक, स्थापत्यतज्ज्ञ, इतिहासकार आणि नागरी संघटना यांचा सहभाग कितपत घेतला गेला, हे स्पष्ट नाही. परिणामी, निर्णय कार्यक्षमतेच्या नावाखाली घेतले जातात, पण त्यांचा सांस्कृतिक परिणाम दीर्घकाळ टिकतो.

एअर इंडिया बिल्डिंग आता नवीन प्रशासकीय उपयोगासाठी तयार होत आहे. परंतु तिच्या भिंतींमध्ये दडलेला इतिहास, तिच्या नावाशी जोडलेली राष्ट्रीय ओळख आणि तिचे स्थापत्य महत्त्व हे सर्व हळूहळू पार्श्वभूमीत जात आहे. विकास आवश्यक आहे, परंतु विकास जर स्मृतींच्या किंमतीवर होत असेल, तर तो किती टिकाऊ आणि अर्थपूर्ण आहे, हा प्रश्न उरतोच. शेवटी, हा व्यवहार केवळ इमारतीचा नाही, तर आपण आपल्या शहरांच्या इतिहासाशी कसा व्यवहार करतो याचा आरसा आहे. आणि त्या आरशात दिसणारे प्रतिबिंब फारसे सुखद नाही.

# लोककलावंतांची उपेक्षा थांबवण्यासाठी ठोस धोरण आवश्यक; पद्मश्री रघुवीर खेडेकर यांची शासनावर टीका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** लोककलावंत समाजप्रबोधनाचे महत्त्वाचे माध्यम असूनही आजही ते उपेक्षित जीवन जगत आहेत. त्यांची आर्थिक आणि सामाजिक आबाळ दूर करण्यासाठी शासनाने तातडीने पुढाकार घ्यावा, अशी ठाम मागणी पद्मश्री रघुवीर खेडेकर यांनी केली.



पुण्यात आयोजित पहिल्या समरसता लोककला संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी लोककलावंतांच्या अडचणी, प्रशासकीय दुर्लक्ष आणि प्रस्थापितांकडून होणाऱ्या अन्यायाकडे लक्ष वेधले. लोककलावंतांना गावोगावी सन्मानाऐवजी अनेकदा उपेक्षा आणि संघर्षाला सामोरे जावे लागते, असे ते म्हणाले.

या संमेलनात ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. विविध लोककलावंत, गायक-नर्तक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. लोककला जतन आणि संवर्धनासाठी शासन, सांस्कृतिक विभाग आणि विविध संस्थांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

खेडेकर यांनी शासनाच्या उपस्थितीबाबतही नाराजी व्यक्त केली. मुख्यमंत्री आणि सांस्कृतिक कार्यमंत्री कार्यक्रमाला उपस्थित राहू न शकल्याने लोककलावंतांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. लोककलावंतांच्या तक्रारींची दखल न घेतली गेल्यास प्रसंगी पद्मश्री पुरस्कार परत करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

कार्यक्रमात विविध लोककलांचे सादरीकरण, पारंपरिक वाद्यांचे प्रदर्शन आणि सांस्कृतिक दिंडीचे आयोजन करण्यात आले. मात्र, या उपक्रमांना केवळ उत्सवी स्वरूप न देता लोककलावंतांच्या जीवनमानात प्रत्यक्ष बदल घडवणारी ठोस धोरणे आवश्यक असल्याची चर्चा यानिमित्ताने पुढे आली आहे.

एकूणच, लोककलांचे संवर्धन आणि गौरव होत असताना त्यांच्या आर्थिक-सामाजिक प्रश्नांवर शासनाने अधिक गंभीरपणे लक्ष देण्याची गरज या संमेलनातून अधोरेखित झाली

# इतरांना सवलत; मग आम्हाला का नाही?; पोलिस भरतीसाठी होमगार्ड जवानांचा सरकारला प्रश्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे: आपत्कालीन परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती, वाहतूक नियमन तसेच कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांसोबत खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या होमगार्ड जवानांचे पोलिस दलात भरती होण्याचे स्वप्न वयोमर्यादेच्या अटीमुळे भंग पावत आहे. होमगार्ड म्हणून तीन वर्षे किंवा त्याहून अधिक सेवा पूर्ण करेपर्यंत अनेक जवान भरतीसाठी निर्धारित वयोमर्यादा ओलांडत असल्याने ते भरती प्रक्रियेतून बाहेर पडतात. त्यामुळे पोलिस शिपाई भरतीत होमगार्ड जवानांना वयोमर्यादेत पाच वर्षांची सवलत देण्यात यावी, अशी मागणी उमेदवारांनी केली आहे. राज्याच्या सुरक्षेत आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यात होमगार्ड जवान महत्त्वाची भूमिका बजावतात. पूरस्थिती असो, सण-उत्सव असोत किंवा निवडणुकांचा बंदोबस्त, होमगार्ड जवान नेहमीच पोलिसांच्या दिमतीला तत्पर असतात. अनेक तरुण हे भविष्यात पोलिस दलात जाण्याचे स्वप्न उराशी बाळगूनच होमगार्ड दलात रुजू होतात. मात्र, पोलिस शिपाई भरतीत होमगार्ड आरक्षणाचा लाभ मिळवण्यासाठी त्यांना किमान ३ वर्षे किंवा त्याहून अधिक काळ सेवा पूर्ण करावी लागते. ही सेवा पूर्ण होईपर्यंत अनेक उमेदवारांचे वय पोलिस भरतीच्या कमाल वयोमर्यादेच्या पुढे निघून जाते. परिणामी, अनुभवाच्या जोरावर पोलिस होण्याआधीच त्यांच्या पदरी निराशा पडते. त्यामुळे सध्याची कमाल वयोमर्यादा ३३ वर्षे असून ती वाढवून ३८ वर्षे करावी, अशी मागणी उमेदवार करत आहेत.

याविषयी उमेदवारांशी संवाद साधला असता ते म्हणाले, ''सध्या पोलिस भरतीमध्ये विविध घटकांना वयोमर्यादेत विशेष सवलत दिली जाते. खेळाडूंना ३८ वर्षांपर्यंत, प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्तांना ४५, माजी सैनिकांना ४५, तर अंशकालीन कर्मचाऱ्यांना ५५ वर्षांपर्यंत वयोमर्यादा शिथिल करण्यात आली आहे. मात्र, प्रत्यक्ष पोलिस दलासोबत काम करणाऱ्या होमगार्ड जवानांना अशा कोणत्याही सवलतीचा लाभ मिळत नाही. यामुळे सरकारने पोलिस शिपाई भरतीसाठी होमगार्ड जवानांना किमान पाच वर्षांची अतिरिक्त वयोमर्यादा सवलत द्यावी. यासंदर्भात साधारण ८० ते ९० निवेदने सरकारच्या विविध प्रतिनिधींना देण्यात आले आहे.''

राज्यातील सुमारे ५० हजार होमगार्ड जवान पोलिसांच्या खांद्याला खांदा लावून मंत्रालयापासून ते तळागाळापर्यंत सुरक्षेचे महत्त्वाचे कर्तव्य बजावतात. मात्र, पोलिस भरतीत प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त किंवा माजी सैनिकांप्रमाणे आम्हाला वयोमर्यादेत कोणतीही सवलत मिळत नाही. सरकारने आमच्या सेवेचा विचार करून पोलिस भरतीच्या वयोमर्यादेत

### कोकणच्या लेकीची जगभर चर्चा! दापोलीच्या प्राजक्ता बोंगाळे ठरल्या अमेरिकन सैन्यातील पहिल्या मराठी महिला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : रत्नागिरी जिल्ह्यातील दापोलीच्या कन्या प्राजक्ता (सारा) बोंगाळे यांनी अमेरिकन सैन्यदलाचे अत्यंत खडतर आणि आव्हानात्मक प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून ऐतिहासिक भरारी घेतली आहे. या देदीप्यमान यशामुळे अमेरिकन सैन्यात सेवा देणाऱ्या त्या महाराष्ट्रातील पहिल्या मराठी महिला ठरल्या आहेत. लहानपणापासून सैन्याविषयी आकर्षण असलेल्या प्राजक्ता यांना एका अपघातामुळे भारतीय लष्करात जाण्याचे स्वप्न बाजूला ठेवावे लागले. पदव्युत्तर शिक्षणानंतर अमेरिकेत स्थायिक झाल्यावर त्यांनी 'क्लिनिकल रिसर्च सायंटिस्ट' म्हणून काम केले

तसेच, सौंदर्य क्षेत्रातही ठसा उमटवत 'यूएसए मिसेस मिडवेस्ट युनिव्हर्स' हा किताब पटकावला. मात्र, मनात असलेली देशसेवेची जिद्द आणि सैन्याविषयीचा आदर त्यांना शांत बसू देत नव्हता. कुटुंब सावरतानाच उत्कृष्ट शारीरिक तंदुरुस्ती, शिस्तबद्ध दिनचर्या आणि सकारात्मक मानसिकतेच्या जोरावर त्यांनी अमेरिकन सैन्यात जाण्याचा धाडसी निर्णय घेतला.

विशेष म्हणजे, या संपूर्ण प्रशिक्षणात उत्कृष्ट नेमबाजीसाठी त्यांना 'मार्क्समनशिप पदक' देऊन गौरविण्यात आले. तसेच बॅचमध्ये सर्वोच्च शैक्षणिक गुणही त्यांनी मिळवले. सध्या त्या सैन्याच्या मेडिकल विभागात कार्यरत आहेत. विज्ञान, सौंदर्य आणि थेट देशसेवा अशा तीन भिन्न क्षेत्रांत गरुडझेप घेणाऱ्या प्राजक्ता यांच्या या प्रवासात त्यांचे पती समीर बोंगाळे यांच्यासह संपूर्ण परिवाराची खंबीर साथ मोलाची ठरली.

# पुणे-मंचर मार्गे नाशिक हायस्पीड रेल्वेसाठी पाठपुरावा सुरूच : माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** पुणे-मंचर मार्गे नाशिक हायस्पीड रेल्वे मार्ग साकारण्यासाठी राज्य शासन आणि केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असून, लवकरच केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन या प्रकल्पाबाबत सविस्तर चर्चा करण्यात येणार असल्याची माहिती माजी गृहमंत्री तथा आमदार दिलीप वळसे पाटील यांनी रविवारी (ता. २८) दिली.

मंचर (ता. आंबेगाव) येथील शरद बँकेच्या सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी पुणे म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, सभापती कैलासबुवा काळे, पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विष्णू हिंगे पाटील, बाजार समितीचे सभापती निलेश थोरात, शरद बँकेचे संचालक अजय घुले आणि ॲड. राहुल पडवळ उपस्थित होते.

वळसे पाटील म्हणाले, ''नियोजित रेल्वे मार्गाबाबत खोडद येथील जागतिक दुर्बीण (जीएमआरटी) केंद्रामुळे कोणतीही तांत्रिक अडचण नसल्याचे तज्ज्ञांच्या अहवालातून स्पष्ट झाले आहे. हा अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. यापूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबरोबरही या विषयावर चर्चा करण्यात आली आहे.''



ते पुढे म्हणाले, ''पुणे-मंचर मार्गे नाशिक रेल्वे प्रकल्प हा आंबेगाव, जुन्नर आणि खेड परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या मार्गामुळे ग्रामीण भागाच्या विकासाला चालना मिळेल. उद्योग, व्यापार, पर्यटन आणि शिक्षण क्षेत्राला मोठा फायदा होणार आहे. हा प्रकल्प केवळ वाहतुकीपुरता मर्यादित नसून संपूर्ण उत्तर पुणे जिल्ह्याच्या विकासाशी निगडित आहे. त्यामुळे हा प्रकल्प मार्गी लावण्यासाठी प्रयत्नांत कोणतीही कसूर ठेवली जाणार नाही.''

'पुणे-मंचर-नाशिक रेल्वे हा जनतेच्या आकांक्षा आणि विकासाशी निगडित अनेक वर्षांचा प्रश्न आहे. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प साकारण्यासाठी शासन व रेल्वे मंत्रालयाच्या सर्व स्तरांवर सातत्याने प्रयत्नांची पराकाष्ठा केली जाईल.'

# पिंपरी-चिंचवडमध्ये गुन्हेगारांचा उच्छाद!

## खुनाचा प्रयत्न, अपहरण आणि जबरी मारहाणीच्या घटनांनी शहर हादरले; पोलीस ॲक्शन मोडमध्ये

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड:** पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय क्षेत्रात गुन्हेगारीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. गेल्या २४ तासांत हिंजवडी, चिखली आणि पिंपरी पोलीस ठाण्यांच्या हद्दीत खुनाचा प्रयत्न, खंडणीसाठी अपहरण आणि धारदार शस्त्राने मारहाणीच्या गंभीर घटना समोर आल्या आहेत. या प्रकरणांमुळे शहरात खळबळ उडाली असून, पोलिसांनी गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यास सुरुवात केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी विविध गुन्ह्यांखाली गुन्हे दाखल करत काही आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत.

**मेव्हण्यानेच केला मेव्हण्यावर खुनी हल्ला; नेरे (हिंजवडी) येथील थरार!**

हिंजवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नेरे येथील चंद्रभागा हाईट्स बिल्डिंगच्या टेरेसवर एका तरुणावर प्राणघातक हल्ला झाल्याची धक्कादायक घटना घडली.

काय आहे प्रकरण?: फिर्यादी रोहित तानाजी शेंडगे (वय ३४) हे टेरेसवर झोपले असताना, त्यांचा मेव्हणा आरोपी विपुल संजय जानकर (रा. सांगली) हा इतर ३ अनोळखी साथीदारांसह तिथे आला. ''माझ्या बहिणीशी भांडण करतो काय, तुला जिवंत सोडणार नाही,'' असे म्हणत विपुलने रोहित यांच्यावर चाकूने वार केले. त्याच्यासोबत असलेल्या दुसऱ्या इसमानेही चाकूने रोहित यांच्या दोन्ही पायांवर वार केले, तर इतर दोघांनी प्लास्टिकच्या काठ्या आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली.

पोलीस कारवाई: हिंजवडी पोलिसांनी या प्रकरणी भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १०९ (१) (खुनाचा प्रयत्न), ११५ (२), ३५१ (२), ३ (५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक (सपोनि) वांगणेकर या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

**टाटा कंपनीच्या गेटवरून सुपरवायझरचे अपहरण! चिखली पोलिसांकडून ४ आरोपी अटकेत**

चिखली येथील टाटा कंपनीच्या मटेरियल गेटजवळून एका सुपरवायझरचे दुचाकीवरून अपहरण करून, खंडणी मागल्याची व मारहाण केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे.

काय आहे प्रकरण?: फिर्यादी विन्सेंट जोसेफ डिसिल्वा (वय ५७, रा. कोंढवा) आणि कंपनीतील एच.आर. मोसीन शेख, प्रोजेक्ट हेड राजेश नायर व सुपरवायझर स्वप्निल सुद हे गेटजवळ उभे होते. यावेळी आरोपी शांताराम तयप्पा शिंदे (रा. नेहरूनगर, पिंपरी) आणि त्याच्या ३ साथीदारांनी तिथे येऊन, आरोपीच्या आईला कामावरून काढून टाकल्याचा राग मनात धरला. त्यांनी फिर्यादी व मोसीन शेख यांना जबरदस्तीने मोटारसायकलवर बसवून नेहरूनगर येथे पळवून नेले.

खंडणीची मागणी: ''माझ्या आईला पुन्हा कामावर घ्या, तसेच माझा पगार वाढवा,'' अशी खंडणीवजा धमकी देत आरोपींनी मॅनेजमेंटशी बोलण्यास सांगितले. फिर्यादींनी कंपनीच्या नियमाप्रमाणे कामावरून कमी केले असल्याचे सांगताच, आरोपींनी त्यांना बेदम मारहाण केली. पोलीस कारवाई: चिखली पोलिसांनी तातडीने कारवाई करत चारही आरोपींना अटक केली आहे. अटक केलेल्यांमध्ये शांताराम तयप्पा शिंदे, साहिल संदीप घाडगे (वय २२, रा. तळवडे), कृष्णा अनंत काळे (वय २१, रा. चिखली) आणि पियुष मधुकर शेंडगे (वय १८, रा. चिखली) यांचा समावेश आहे. सपोनि मोटे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

**संततुकारामनगर पोलिसांची मोठी कारवाई; नेहरूनगरमध्ये कोयता घेऊन फिरणारा गुंड जेरबंद**

नेहरूनगर परिसरात दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीरपणे लोखंडी कोयता बाळगणाऱ्या एका सराईत गुंडाला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

कारवाईचा तपशील: संततुकारामनगर पोलीस ठाण्याचे पोलीस शिपाई अनिल लालासो मोहिते हे गस्तीवर असताना, त्यांना एच.ए. ग्राउंड नेहरूनगर येथे एक संशयित तरुण आढळून आला. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे ३०० रुपये किमतीचा एक धारदार लोखंडी कोयता मिळून आला.

पोलीस कारवाई: पोलिसांनी आरोपी रोहित राजेश मिश्रा (वय २३, रा. नेहरूनगर, पिंपरी) याला अटक केली असून, त्याच्याविरुद्ध भारतीय हत्यार कायदा व महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोहवा/१९३५ पाटील या प्रकरणाचा तपास करत आहेत.

### आईच्या निधनाचा धक्का असह्य; पुण्यात तरुणाचा दुर्दैवी मृत्यू, एकाच दिवशी माय-लेकालाच अखेरचा निरोप..

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** आजारी असलेल्या आईची प्राणज्योत मावळल्याचा धक्का सहन न झाल्याने २२ वर्षीय मुलाने शनिवारी सकाळी घरात गळफास घेऊन आपले जीवन संपवले. वैकुंठ स्मशानभूमीत या मायलेकांवर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. दा दोडके (वय ५०) आणि साहिल गणेश दोडके (वय २५, दोघे रा. पर्वती दर्शन) अशी या मायलेकाची नावे आहेत. दोडके कुटुंब काही दिवसांपूर्वीच पर्वती दर्शन परिसरात राहायला आले होते. मंदा दोडके या वृद्ध रुग्णांच्या सेवाशुश्रुषेचे काम करायच्या. साहिल हा घरातला एकुलता एक मुलगा होता.

त्याला चार मोठ्या बहिणी आहेत. साहिल पहाटे उठून लोकांच्या घरी दुधाच्या पिशव्या टाकत आणि लिफ्ट दुरुस्तीची कामे करत. बिकट परिस्थितीत तो कुटुंबाची आर्थिक जबाबदारी सांभाळत होता.

मंदा दोडके यांना गुरुवारी पहाटे अचानक अर्धांगवायूचा तीव्र झटका आला. साहिलने त्यांना उपचारासाठी तातडीने ससून रुग्णालयात दाखल केले. मात्र, त्यांची प्रकृती खालावत चालली होती. मात्र, उपचारांदरम्यान त्याच्या आईचे निधन झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. आईला वाचवू न शकल्याचे असह्य दुःख आणि एकाकीपणाच्या भावनेतून त्याने तातडीने घर गाठले. आईच्या निधनाचा धक्का सहन न झाल्याने त्याने पंख्याला साडी लावून गळफास घेत आत्महत्या केली. सकाळी साडेनऊ-दहाच्या सुमारास त्याच्या नातेवाईकांनी त्याचा दरवाजा ठोठावला. मात्र, त्याने आतून प्रतिसाद दिला नाही. त्याच्या नातेवाईकाने दरवाजा उघडून फटीतून पाहिले असता, साहिलने गळफास घेतल्याचे दिसले. त्याला तातडीने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले. एकाच दिवशी घराचा आधार आणि मायेची सावली गमावलेल्या या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

आईचा मृत्यू झाल्याने मुलाने आत्महत्या केल्याची माहिती पर्वती पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र सहाणे यांनी दिली. साहिल दोडके याने गळफास घेतल्याचे कळल्यावर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन त्याला ससून रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारांपूर्वी त्याचा मृत्यू झाला होता.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### नारायणगावात टोमॅटोच्या भावात घसरण; उपबाजारात हंगामातील उच्चांकी ६० हजार टोमॅटो क्रेटची आवक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नारायणगाव** : जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नारायणगाव उपबाजारात शनिवारी (ता.२७) सुमारे ६० हजार टोमॅटो क्रेटची हंगामातील उच्चांकी आवक झाली. खुल्या पद्धतीने झालेल्या लिलावात प्रतवारीनुसार टोमॅटो क्रेटला (वीस किलोग्रॅम) १०० रुपये ते ३५० रुपयांच्या दरम्यान बाजारभाव मिळाला. आवक वाढल्याने टोमॅटोच्या बाजारभावात घसरण झाली. बाजारभावात टोमॅटोच्या प्रतिक्रेट मागे शंभर रुपये ते दोनशे रुपयांच्या दरम्यान घट झाली.

मार्च, एप्रिलमध्ये रोपांची लागवड झालेल्या टोमॅटोचा तोडणी हंगाम मागील १५ दिवसांपासून सुरू झाला आहे. येथील उपबाजार आवारात जुन्नर, आंबेगावसह संगमनेर, पारनेर, शिरूर या भागातून टोमॅटोची मोठ्या प्रमाणात आवक होत आहे.

मागील आठवड्यात टोमॅटो क्रेटला प्रतवारीनुसार २०० ते साडेसहाशे रुपयांच्या दरम्यान भाव होता. झालेल्या भांडवलाचा विचार करता सध्याच्या बाजारभावात जेमतेम भांडवली खर्च वसूल होईल, अशी परिस्थिती आहे. टोमॅटो क्रेटला किमान सहाशे ते सातशे रुपये भाव मिळावा, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

**कोथिंबीर, मेथीला समाधानकारक भाव**

उपबाजारात शनिवारी रात्री कोथिंबीर, मेथी, शेपूच्या २ लाख ९२ हजार जुड्यांची आवक झाली. कोथिंबीर जुडीला शेकडा ४०० रुपये ते तीन हजार ३०० रुपयांच्या दरम्यान, मेथीच्या जुडीला शेकडा ९०० रुपये ते तीन हजार २०० रुपयांच्या दरम्यान, शेपूच्या जुडीला ९०० रुपये ते दोन हजार ३०० रुपयांच्या दरम्यान भाव मिळाला. नारायणगाव भाजी बाजारात भाजीपाल्यांच्या सहा हजार १८३ डागांची आवक झाली. या पैकी हिरवी मिरचीच्या ८००, काकडीच्या ७७५, फुलकोबीच्या ९९३ डागाची आवक झाली. प्रमुख भाजीपाल्याला प्रतवारीनुसार प्रतिकिलोग्रॅम मिळालेला बाजारभाव (रुपयांत) : काकडी : ३-३१, हिरवी व ढोबळी मिरची : ४-५५, फ्लॉवर, कोबी : ३-२०, शेवगा शेंग : ४५-६० रुपये, घेवडा : २०-८५, वांगी : ३ ते २५, भेंडी : ५ ते ५०, पपडी, वालवड : ६०-८०, दुधी भोपळा : ३-२५, चवळी - ४-४०, ढोडका : ६-६३, गवार : ६-५५, भुईमूग शेंग : ४९-६७, बटाटा : १३-१५.

पंधरा एकर क्षेत्रात लागवड केलेल्या टोमॅटोची तोडणी सुरू आहे. दररोज १ हजार २०० क्रेट उत्पादन निघत आहे. एकरी सुमारे तीन लाख रुपये खर्च झाला आहे.

# शिवराज्याभिषेक सोहळ्यात ‘राष्ट्र कर्तव्य’ सेवाभावी संघटनेचे उद्घाटन; सांस्कृतिक उपक्रमांबरोबरच सामाजिक उद्दिष्टांचा प्रश्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी / पुणे** : शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून ३५३ वा शिवराज्याभिषेक सोहळा आणि नव्याने स्थापन झालेल्या ‘राष्ट्र कर्तव्य’ सेवाभावी संघटनेचे औपचारिक उद्घाटन पुण्यात करण्यात आले. बीजाभिषेक, जलाभिषेक, शस्त्र-वनस्पती पूजन आणि सांगीतिक मानवंदना अशा विविध धार्मिक-सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून कार्यक्रम साजरा करण्यात आला.

कार्यक्रमात शिवरायांना स्थानिक व देशी वनस्पतींचा बीजाभिषेक, पवित्र जलाने जलाभिषेक, तसेच सरदार घराण्यांच्या वारसदारांचा सन्मान असे उपक्रम राबविण्यात आले. विविध संस्था आणि व्यक्तींच्या सहकार्याने हा सोहळा मोठ्या प्रमाणात आयोजित करण्यात आला असून नागरिक, शिवप्रेमी, अभ्यासक आणि कलाकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी ‘राष्ट्र कर्तव्य’ या संघटनेचे बोधचिन्ह अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमात अर्थतज्ज्ञ अभय टिळक अध्यक्षस्थानी होते, तर राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेतील शास्त्रज्ञ डॉ. अशोक गिरी यांनी उद्घाटन केले. इतिहास संशोधक, वनस्पतीशास्त्रज्ञ, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि सरदार घराण्यांचे प्रतिनिधीही उपस्थित होते.




कार्यक्रमात शिवचरित्राशी संबंधित सांस्कृतिक सादरीकरणे आणि संगीत सादरीकरणेही झाली. विविध कलाकारांनी सांगीतिक मानवंदना दिली. तसेच बीजाभिषेकासाठी स्थानिक देशी बियाण्यांचा वापर करण्यात आला, अशी माहिती आयोजकांनी दिली.

मात्र, अशा मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या सांस्कृतिक आणि प्रतीकात्मक कार्यक्रमांबाबत काही महत्त्वाचे प्रश्नही उपस्थित होतात. अशा उपक्रमांचा सामाजिक स्तरावर नेमका किती परिणाम होतो, नवीन स्थापन झालेल्या सेवाभावी संघटनेचे दीर्घकालीन उद्दिष्ट, कार्यपद्धती आणि पारदर्शकता काय असेल, याबाबत स्पष्टता अद्याप दिसत नाही.

अनेकदा अशा संघटना मोठ्या सांस्कृतिक व्यासपीठावरून सुरू होतात, मात्र पुढे जाऊन त्यांचे सामाजिक कार्य किती प्रभावी आणि सातत्यपूर्ण राहते, हे महत्त्वाचे ठरते. बीजाभिषेक, परंपरा आणि सांस्कृतिक अभिमान यांसोबतच ग्रामीण विकास, पर्यावरण संवर्धन किंवा प्रत्यक्ष सामाजिक काम यासाठी ठोस आराखडा आहे का, यावरही लक्ष दिले जात आहे.

या उपक्रमात विविध संस्था, कार्यकर्ते आणि स्थानिक गटांचा सहभाग होता. कार्यक्रमाचे आयोजन मोठ्या प्रमाणात आणि समन्वयाने झाले असले तरी, अशा उपक्रमांना केवळ प्रतीकात्मक स्वरूप न राहता प्रत्यक्ष सामाजिक बदलाशी जोडले जाण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. एकूणच, शिवराज्याभिषेकासारख्या ऐतिहासिक दिवसाचे औचित्य साधून सांस्कृतिक अभिमान व्यक्त होत असताना, नव्याने स्थापन झालेल्या ‘राष्ट्र कर्तव्य’ संघटनेच्या पुढील कार्याची दिशा आणि परिणामकारकता याकडे आता लक्ष लागले आहे.

## वडगाव आनंद जि.प. शाळेत मियावाकी पद्धतीने ३ हजार वृक्षांची ऐतिहासिक लागवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर** : आदर्श जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वडगाव आनंद येथे एम्पथी फाउंडेशन, मुंबई यांच्या सहकार्याने मियावाकी पद्धतीने ३,००० वृक्षांची लागवड करण्यात आली. सुमारे १५ लाख रुपये खर्चाच्या या प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील अशा प्रकारचा उपक्रम राबविणारी ही पहिली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठरणार आहे.



मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गट विकास अधिकारी प्रतीक चन्नावर, गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे तसेच सामाजिक कार्यकर्ते डी. बी. (नाना) वाळुंज, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय चौगुले पाटील आणि मुख्याध्यापक सुनील ठिकेकर यांच्या सहकार्याने हा उपक्रम साकारला. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणप्रेमाची जाणीव निर्माण करण्यासह जैवविविधता संवर्धन आणि पर्यावरण संरक्षणासाठी हा प्रकल्प राज्यातील इतर जिल्हा परिषद शाळांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

## पत्रकारांशी गैरवर्तन करणाऱ्या खासदार संजय दिना पाटील यांच्या निषेधार्थ आंबेगाव तालुका पत्रकार संघाचे निवेदन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर** : ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांशी कथितरित्या शिवीगाळ, अरेरावी करत जोडे मारण्याची धमकी दिल्याच्या घटनेचा निषेध करत आंबेगाव तालुका पत्रकार संघाने काळ्या फिती लावून आंदोलन केले. तसेच या घटनेच्या निषेधार्थ मंचर येथील प्रांत कार्यालयात नायब तहसीलदार सचिन मुंडे यांना निवेदन देण्यात आले.



यावेळी पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, एका वादग्रस्त राजकीय वक्तव्यावर प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे काही पत्रकार खासदार संजय दिना पाटील यांच्याकडे गेले असता त्यांनी पत्रकारांशी गैरवर्तन करत कथितरित्या गलिच्छ भाषेत शिवीगाळ केली आणि जोडे मारण्याची धमकी दिली.

लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांशी एका जबाबदार लोकप्रतिनिधीने अशा प्रकारचे वर्तन करणे अत्यंत निषेधार्ह असून, लोकशाही मूल्यांना धक्का देणारे असल्याचे संघाने म्हटले आहे. आंबेगाव तालुका पत्रकार संघाने या घटनेचा तीव्र निषेध नोंदवत संबंधित खासदारांवर योग्य ती कारवाई करण्याची मागणी शासनाकडे केली आहे.

पत्रकारांना निर्भय वातावरणात काम करता यावे आणि भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी संघाचे अध्यक्ष संतोष वळसेपाटील, उपाध्यक्ष नीलेश काण्णव, डी. के. वळसे पाटील, सचिव चंद्रकांत घोडेकर, सुदाम बिडकर, जयेश शहा, सीताराम काळे, विवेक शिंदे, रवींद्र वाळके, लक्ष्मण ढोबळे, विशाल करंडे, सचिन तोडकर, अविनाश पवार, मोसीन काठेवाडी आदी पत्रकार उपस्थित होते.

## राखीव वनक्षेत्रात मृत ब्रॉयलर कोंबड्या टाकणाऱ्यांवर वन विभागाची कारवाई

### तिघांविरुद्ध वनगुन्हा दाखल; मोटारसायकल जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर** : मंचर वनपरिक्षेत्रातील मौजे काठापूर बुद्रुक येथील राखीव वनक्षेत्रात मृत ब्रॉयलर कोंबड्यांची बेकायदेशीर विल्हेवाट लावताना तीन जणांना वन विभागाने रंगेहात पकडले. संबंधित तिघांविरुद्ध भारतीय वन अधिनियमांतर्गत वनगुन्हा दाखल करण्यात आला असून, गुन्ह्यात वापरण्यात आलेली मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे.

वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित गस्तीदरम्यान फॉरेस्ट कंपार्टमेंट क्रमांक २५० मध्ये दुपारच्या सुमारास मोटारसायकल (क्रमांक एमएच-०३-पी-८७४२) वरून आलेले तीन जण विनापरवाना राखीव वनक्षेत्रात प्रवेश करून मृत ब्रॉयलर कोंबड्यांची दोन पोती टाकत असल्याचे निदर्शनास आले. वन कर्मचाऱ्यांनी तात्काळ कारवाई करत त्यांना ताब्यात घेतले.

चौकशीत या मृत ब्रॉयलर कोंबड्या विकास दत्तात्रय चांगल (रा. पारगाव, ता. आंबेगाव) यांच्या गट क्रमांक २६२ मधील पोल्ट्री फार्ममधील असल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी प्रसाद सुनील भोर (रा. भोरवाडी, ता. आंबेगाव), प्रकाश शिवराम खंडागळे (रा. खामगाव, ता. जुन्नर) आणि सुरज हरिभाऊ पारधी (रा. कदळी, ता. जुन्नर) यांनी कोणतीही वैध परवानगी न घेता राखीव वनक्षेत्रात प्रवेश करून जैविक कचरा टाकल्याचे निष्पन्न झाले.

वन विभागाने तिघांविरुद्ध भारतीय वन अधिनियमांतर्गत गुन्हा नोंदवून घटनास्थळाचा पंचनामा केला. गुन्ह्यात वापरण्यात आलेली मोटारसायकल जप्त करण्यात आली असून, आवश्यक पुरावे संकलित करून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई उपवनसंरक्षक प्रशांत खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली, सहाय्यक वनसंरक्षक अमृत शिंदे यांच्या नियंत्रणाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले, वनपरिमंडळ अधिकारी निलम चव्हाण, वनरक्षक पूजा कांबळे तसेच काठापूर बुद्रुक येथील ग्रामस्थ अशोक करंडे, बबन जाधव, नवनाथ जाधव आणि ज्ञानेश्वर जाधव यांच्या सहकार्याने करण्यात आली. संबंधित ग्रामस्थांनी वेळेवर माहिती देऊन कारवाईसाठी महत्त्वपूर्ण सहकार्य केल्याचे वन विभागाने सांगितले.

**वन विभागाचे आवाहन**

राखीव वनक्षेत्रात विनापरवाना प्रवेश करणे तसेच मृत कोंबड्या किंवा इतर कोणताही जैविक अथवा घातक कचरा टाकणे हा कायद्याने दंडनीय गुन्हा आहे. अशा प्रकारची घटना आढळल्यास नागरिकांनी तात्काळ मंचर वनपरिक्षेत्र कार्यालयाशी संपर्क साधून माहिती द्यावी, असे आवाहन वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांनी केले. नागरिकांच्या सहकार्यामुळे वनसंपत्तीचे संरक्षण, पर्यावरण संवर्धन आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने अशा बेकायदेशीर प्रकारांना आळा घालणे शक्य होणार असल्याचे त्यांनी

## “लग्न मोडण्यापेक्षा केतनला संपवणं सोपं वाटलं”; चौकशीतून सिया गोयलचा धक्कादायक खुलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : केतन अग्रवाल हत्या प्रकरणाच्या तपासाला आता वेग आला असून, या प्रकरणातील आरोपी सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन चौधरी यांना अटक करण्यात आली आहे. दोघांना घटनास्थळी नेऊन पोलिसांनी संपूर्ण घटनेचा सीन रिक्रिएट केला. यावेळी केतन अग्रवालची हत्या नेमकी कशी करण्यात आली, याची सविस्तर माहिती तपास पथकाने पडताळून पाहिली.



**घटनास्थळी नेऊन तपास**

तपासाचा भाग म्हणून पोलिसांनी सिया गोयल आणि चेतन चौधरी या दोघांना लोहगडावर आणले. याच ठिकाणी केतन अग्रवालला दरीत कशा प्रकारे ढकलण्यात आले, याचा घटनाक्रम दोघांकडून समजून घेण्यात आला. लोहगड किल्ल्यावरील हत्ती तलावाजवळील दरीत केतनला ढकलल्याचा आरोप या दोघांवर आहे. घटनास्थळी प्रत्यक्ष पाहणी करत पोलिसांनी संपूर्ण सीन रिक्रिएट केला.

**चौकशीत धक्कादायक कबुली**

या प्रकरणाच्या चौकशीत सिया गोयलने धक्कादायक कबुली दिल्याची माहिती समोर आली आहे. चौकशीदरम्यान तिने, “लग्न मोडण्यापेक्षा केतनची हत्या करणे सोपे वाटले,“ असे सांगितल्याचे समोर आले आहे. या कबुलीनंतर तपासाला नवे वळण मिळाले असून, पोलिसांकडून या प्रकरणातील विविध पैलूंची पडताळणी सुरू आहे.

**लग्न नको होते, म्हणून कट रचल्याचा आरोप**

मिळालेल्या माहितीनुसार, नोव्हेंबर महिन्यात होणारे लग्न मोडल्यास कुटुंबांच्या भावना दुखावल्या जातील, अशी भावना सियाच्या मनात होती. त्यामुळे लग्न रद्द करण्याऐवजी होणाऱ्या पतीची हत्या करण्याचा निर्णय घेतल्याचे चौकशीत समोर आल्याचे सांगितले जात आहे. केतन अग्रवालशी लग्न करायचे नसल्याने सियाने तिचा प्रियकर चेतन चौधरी याच्या मदतीने कट रचल्याचा आरोप दोघांवर आहे. या कटानुसार केतनला लोहगड किल्ल्यावर नेण्यात आले आणि हत्ती तलावाजवळील दरीत ढकलून त्याची हत्या करण्यात आल्याचा आरोप तपासात समोर आला आहे.

**विविध पैलूंवर तपास सुरू**

केतन अग्रवाल हत्या प्रकरणात पुणे ग्रामीण पोलिसांकडून विविध अंगांनी तपास सुरू आहे. आरोपींची चौकशी, घटनास्थळाची पाहणी आणि सीन रिक्रिएशनच्या माध्यमातून पोलिसांकडून घटनेतील प्रत्येक बाब तपासली जात असून, या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.

## महापालिकेची क्रीडा शिष्यवृत्ती योजना पुन्हा सुरू, चार वर्षांचा खंड संपला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : शहरातील जिल्हा, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना आर्थिक पाठबळ देण्यासाठी पुणे महापालिकेने चार वर्षांच्या खंडानंतर क्रीडा शिष्यवृत्ती योजना पुन्हा सुरू केली आहे. महापालिकेवर प्रशासकीय राजवट लागू झाल्यानंतर आणि लोकनियुक्त प्रतिनिधी नसल्यामुळे ही योजना गेल्या चार वर्षांपासून बंद होती. मात्र, जानेवारी २०२६ मध्ये महापालिकेची निवडणूक झाल्यानंतर नव्या प्रशासनाने २०२५-२६ आणि २०२६-२७ या दोन आर्थिक वर्षांसाठी शिष्यवृत्ती अर्ज प्रक्रिया सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

महापालिकेच्या क्रीडा धोरण २०१८ अंतर्गत राबविण्यात येणारी ही योजना गुणवंत खेळाडूंना सराव, स्पर्धांमधील सहभाग, क्रीडा साहित्य खरेदी आणि प्रशिक्षणासाठी आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आली आहे.

आर्थिक मदतीअभावी अनेक खेळाडूंना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी होण्यास अडचणी येतात. त्या पार्श्वभूमीवर ही योजना महत्त्वाची मानली जाते. इच्छुक खेळाडूंना २९ जून ते १५ जुलै २०२६ या कालावधीत ऑनलाइन अथवा ऑफलाइन अर्ज करता येणार आहेत.

ऑफलाइन अर्ज पंडित नेहरू स्टेडियम, स्वारगेट येथील महापालिकेच्या क्रीडा विभागात स्वीकारले जाणार असून, अर्जाचा नमुना, पात्रता, अटी-शर्ती आणि निवड प्रक्रियेची सविस्तर माहिती महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. खेळाडूंच्या प्रगतीला मिळणार नवी गती

महापालिकेने २०१३ मध्ये क्रीडा शिष्यवृत्ती योजना सुरू केली होती. त्यानंतर क्रीडा धोरणात सुधारणा करत शिष्यवृत्तीची रक्कम वाढविण्यात आली होती. काही वर्षे ही योजना नियमित राबविली गेली; मात्र प्रशासकीय कालावधीत ती बंद पडली. आता पुन्हा ही योजना सुरू झाल्याने शहरातील गुणवंत आणि उदयोन्मुख खेळाडूंना मोठा दिलासा मिळणार असल्याची प्रतिक्रिया क्रीडा क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

## शिरूर पालिकेचा अजब कारभार; जिजामाता गार्डनमध्ये अपघातांची मालिका सुरूच

### दुरुस्तीच्या नावाखाली केवळ तात्पुरती मलमपट्टी; नगराध्यक्षा लक्ष देण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे : शिरूर** : शहरातील जिजामाता गार्डनमध्ये गेल्या काही दिवसांपासून अपघातांची मालिका सुरूच असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. गार्डनच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामात पालिका प्रशासनाकडून केवळ तात्पुरती मलमपट्टी केली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.



गार्डनमध्ये फिरण्यासाठी येणाऱ्या लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि कुटुंबीयांना अपुऱ्या देखभालीमुळे अडचणींचा सामना करावा लागत आहे. काही ठिकाणी पायवाटा तुटलेल्या अवस्थेत असल्याने घसरून पडण्याच्या घटना वारंवार घडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. तसेच आवश्यक दुरुस्ती वेळेत न केल्याने धोका वाढत असल्याचीही तक्रार करण्यात येत आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, केवळ तात्पुरती दुरुस्ती करून समस्या दडपण्याचा प्रयत्न केला जात असून, यावर कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक आहे. गार्डनसारख्या सार्वजनिक ठिकाणी सुरक्षितता ही प्राथमिक गरज असताना प्रशासनाकडून होत असलेल्या हलगर्जीपणाबाबत संताप व्यक्त केला जात आहे.

या पार्श्वभूमीवर नगराध्यक्षा यांनी तातडीने लक्ष घालून संबंधित अधिकाऱ्यांना ठोस आणि कायमस्वरूपी दुरुस्तीच्या सूचना द्याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. तसेच गार्डनची नियमित देखभाल करून नागरिकांना सुरक्षित आणि चांगले मनोरंजन स्थळ उपलब्ध करून द्यावे, अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे.

## सारांश वृत्त

### सेशेल्सकडून पंतप्रधान मोदींना पुरस्काराचा दावा



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**सेशेल्स :** सोशल मीडियावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सेशेल्सकडून **Guardian of the Blue Horizon** नावाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार मिळाल्याचा दावा मोठ्या प्रमाणात फिरत आहे. मात्र या दाव्याबाबत कोणतीही अधिकृत पुष्टी किंवा विश्वसनीय नोंद उपलब्ध नाही.

सेशेल्स सरकारकडूनही अशा नावाच्या पुरस्काराची अधिकृत घोषणा आढळत नाही. त्यामुळे हा दावा अधिकृत माहितीपेक्षा सोशल मीडियावरील अतिरंजित प्रचाराचा भाग असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारच्या अप्रमाणित माहितीद्वारे जनतेमध्ये गैरसमज पसरू शकतो. त्यामुळे कोणतीही माहिती शेअर करण्यापूर्वी तिची खातरजमा करणे आवश्यक आहे.

### प्रिन्स हॅरी-मेघन मार्कल 'राजघराण्यात परत' दावा; अधिकृत पुष्टी नाही



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लंडन :** ब्रिटनच्या राजघराण्यातील **Prince Harry** आणि **Meghan Markle** पुन्हा राजघराण्याच्या भूमिकेत परत येणार असल्याचा दावा सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. मात्र बकिंगहॅम पॅलेस किंवा किंग चार्ल्स यांच्याकडून याबाबत कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. हॅरी आणि मेघन यांनी २०२० मध्ये राजघराण्याच्या वरिष्ठ जबाबदाऱ्यांपासून दूर होण्याचा निर्णय घेतला होता आणि ते सध्या अमेरिकेत वास्तव्यास आहेत. त्यामुळे राजघराण्यात परत ही चर्चा अद्याप केवळ अफवा आणि माध्यमीय अंदाजांच्या पातळीवर असल्याचे स्पष्ट होते.

# सोने आणि पेट्रोलबाबतच्या आवाहनाचा परिणाम दिसतोय,लोक प्रतिसाद देताहेत; पंतप्रधान मोदींनी 'मन की बात'मध्ये सांगितले अनेक अनुभव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पंतप्रधान मोदींनी रविवारी 'मन की बात'च्या १३५ व्या भागात सोने खरेदी न करण्याचे आणि पेट्रोल व डिझेलची बचत करण्याचे आवाहन केल्यामुळे झालेल्या परिणामांवर चर्चा केली. पंतप्रधान मोदी म्हणाले, ''देशातील प्रत्येक नागरिकाने माझ्या आवाहनाला केवळ पाठिंबाच दिला नाही तर त्यात सक्रिय सहभागही नोंदवला, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. अनेक कुटुंबांनी त्यांचे अनुभव माझ्याशी शेअर केले आहेत.

अनेक कुटुंबांनी घरातील लग्नांसाठी सोने न खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे; गरज पडल्यास, ते जुन्या सोन्याचाच पुनर्वापर (रिसायकल) करतील. अनेक लोकांनी 'कारपूलिंग'बाबतचे (एकाच गाडीतून एकत्र प्रवास करण्याबाबतचे) अनुभवही सांगितले आहेत; एकाच दिशेने जाणारे लोक आता स्वतंत्र गाड्यांऐवजी एकत्र प्रवास करत आहेत. मला आनंद आहे की आपण भारतीय या संकटाचा सामना एकजुटीने करत आहोत.'' असं पंतप्रधान मोदी म्हणाले.

इराण-अमेरिका-इस्रायल संघर्षामुळे निर्माण झालेल्या जागतिक संकटाच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान मोदींनी नुकतेच जनतेला पेट्रोल आणि डिझेलची बचत करण्याचे, वर्षभर सोने खरेदी टाळण्याचे आणि कारपूलिंगचा अवलंब करण्याचे आवाहन केले होते. आज 'मन की बात' कार्यक्रमादरम्यान त्यांनी या आवाहनांच्या परिणामांबद्दल भाष्य केले.



पंतप्रधान मोदी म्हणाले, ''मी लोकांना शक्य तितका काळ सोने खरेदी टाळण्यास सांगितले होते. मी त्यांना परदेशी पर्यटन टाळण्याचे आणि कारपूलिंगला प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले होते. तसेच, मी शेतकऱ्यांना रासायनिक-मुक्त शेतीचा अवलंब करण्यास, जमिनीचे रक्षण करण्यास आणि नैसर्गिक खतांचा जास्तीत जास्त वापर करण्यास विनंती केली होती... अनेक कुटुंबांनी संदेश पाठवून त्यांचे अनुभव कळवले आहेत. अनेक कुटुंबांनी यावेळी लग्नासाठी सोने न खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे; गरज भासल्यास, ते जुन्या सोन्यापासूनच नवीन दागिने बनवून घेतील...''

पंतप्रधान मोदींनी 'मन की बात' कार्यक्रमात योग दिनाबद्दलही भाष्य केले. ते म्हणाले, ''जून महिन्यात, 'आंतरराष्ट्रीय योग दिना'निमित्त जगभरातील २,५०० हून अधिक ठिकाणी विविध योग कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.'' नौदलात समाविष्ट करण्यात आलेल्या तीन नवीन जहाजांबद्दल बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, ''जून महिन्यात देशाने असे टप्पे गाठले आहेत ज्यांचा प्रत्येक नागरिकाला अभिमान वाटेल. या कामगिरी देशाच्या सुरक्षेशी आणि आत्मनिर्भरतेशी संबंधित आहेत. अलीकडेच मला कोलकाता येथे नौदलाच्या एका कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची संधी मिळाली.

# शिवरायांचा काळ जिवंत अनुभवण्याची संधी; १२ युनेस्को किल्ल्यांवर 'गडकिल्ले महोत्सव'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या आणि नुकत्याच युनेस्को जागतिक वारसा यादीत समाविष्ट झालेल्या १२ किल्ल्यांवर राज्य शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत भव्य 'गडकिल्ले महोत्सव' आयोजित करण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी शासनाने ६० लाख रुपयांच्या निधीस मान्यता दिली असून प्रत्येक किल्ल्यासाठी ५ लाख रुपये वितरित करण्यात येणार आहेत.

या किल्ल्यांमध्ये रायगड, शिवनेरी, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, लोहगड, साल्हेर, खांदेरी, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, सिंधुदुर्ग आणि जिंजी यांचा समावेश आहे.

**वारसा पर्यटनाला नवी चालना**

युनेस्को मानांकनानंतर महाराष्ट्राच्या दुर्गवैभवाला जागतिक ओळख मिळाली असून या किल्ल्यांचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व पर्यटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी हा महोत्सव राबविण्यात येत आहे. यामुळे वारसा पर्यटनाला चालना मिळेल तसेच स्थानिक अर्थव्यवस्थेलाही बळ मिळेल, असा शासनाचा विश्वास आहे.

**शिवकालीन इतिहासाचा अनुभव**

महोत्सवात शिवकालीन इतिहासावर आधारित नाट्यप्रयोग, लोककला सादरीकरण, दुर्गसंवर्धन जनजागृती कार्यक्रम, ऐतिहासिक प्रदर्शने आणि माहितीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामुळे पर्यटकांना शिवकालीन काळाचा जिवंत अनुभव घेता येणार आहे.

**जागतिक स्तरावर प्रचार-प्रसार**

या उपक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्राचा समृद्ध वारसा देश-विदेशातील पर्यटकांपर्यंत पोहोचविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. शिवकालीन इतिहास, संस्कृती आणि परंपरा यांचा संगम घडवून हा उपक्रम वारसा संवर्धनाला नवे बळ देणार आहे.

'गडकिल्ले महोत्सव' हा केवळ सांस्कृतिक कार्यक्रम नसून शिवरायांच्या पराक्रमाचा वारसा जपण्याचा आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरणार आहे.

# १०० पुरुष, १५ महिलांशी शारीरिक संबंध, रात्रीच्या वेळी दारु पाजायचा अन्...

## एचआयव्ही पॉझिटीव्ह डिलीवरी बॉय निघाला सायको किलर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भोपाळ :** भोपाळमधील कटारा हिल्स हत्या प्रकरणाने संपूर्ण देश हादरला असून पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. चौकशीदरम्यान या प्रकरणात अनेक धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. आरोपीचे १०० हून अधिक पुरुषांशी तसेच १५ महिलांशी शारीरिक संबंध असल्याचा दावा त्याने चौकशीत केला आहे. त्यामुळे चांगलीच खळबळ उडाली आहे. डिलिव्हरी बॉय म्हणून काम करणारा हा तरुण प्रत्यक्षात अत्यंत विकृत मानसिकतेने गुन्हे करत असल्याचे तपासात उघड झाले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी डिलिव्हरीचे काम करत होता. त्यामुळे त्याला शहरातील रस्ते आणि सुनसान भागांची चांगली माहिती होती. रात्रीच्या





वेळी तो शहरात फिरत असे आणि एकटे दिसणाऱ्या व्यक्तींना पैशांचे आमिष दाखवून किंवा दारू पाजून आपल्या जाळ्यात ओढत असे.

चौकशीत आरोपीने १०० हून अधिक पुरुष आणि १५ महिलांशी शारीरिक संबंध ठेवल्याचा दावा केला आहे. त्यामुळे त्याच्या संपर्कात आलेल्या लोकांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची व्याप्ती वाढवली आहे. त्याचा मोबाईल जप्त करण्यात आला असून सोशल मीडिया अकाउंट्स, चॅट्स आणि इतर डिजिटल पुरावे तपासले जात आहेत.

या प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे आरोपी एचआयव्ही पॉझिटिव्ह असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे त्याने जाणीवपूर्वक इतरांना संसर्ग करण्याचा प्रयत्न केला होता का, याचाही तपास सुरू आहे.

हत्येच्या दिवशी आरोपीने मृत व्यक्तीला आधी भरपूर दारू पाजली. तो बेशुद्ध झाल्यानंतर त्याला ओढत पुलाखाली नेले आणि मोठ्या दगडावर त्याचे डोके आपटून त्याची हत्या केली. त्यानंतर मृतदेहासोबतही विकृत कृत्य केल्याची कबुली त्याने दिली आहे. सध्या आरोपी ३० जूनपर्यंत पोलिस कोठडीत असून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# ना रुग्णवाहिका ना स्ट्रेचर.. पाच वर्षांच्या चिमुकल्याचा मृतदेह कडेवर घेऊन वडिलांची पायपीट, बघून अनेकांचे डोळे पाणावले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भगवंतपूर (भोपाळ):** अपघातात पाच वर्षांच्या चिमुकल्याचा मृत्यू झाल्यानंतर वडिलांना मुलाचा मृतदेह कडेवर घेऊन रुग्णालयात भटकावे लागल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मध्य प्रदेशातील विदिशा जिल्ह्यातील भगवंतपूर गावात हा प्रकार घडला. या घटनेमुळे देशातील सरकारी आरोग्य व्यवस्थेचे वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे. पीडित कुटुंबाला वेळेवर स्ट्रेचर किंवा रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्याने सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे.

ही घटना सिरोंज तालुक्यातील भगवंतपूर गावातील आहे. अपघातानंतर जखमी मुलाला तातडीने शासकीय राजीव गांधी रुग्णालयात नेण्यात आलं. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं. दुःखाच्या या क्षणी किमान आवश्यक सुविधा मिळतील, अशी कुटुंबाची अपेक्षा होती. मात्र, रुग्णालयात मृतदेह नेण्यासाठी स्ट्रेचर उपलब्ध नव्हते. तसेच रुग्णवाहिकाही मिळाली नाही, असा आरोप कुटुंबीयांनी केला आहे.

अखेर वडिलांनी आपल्या



चिमुकल्याचा मृतदेह कडेवर उचलून स्वतःच शवविच्छेदन कक्षापर्यंत नेला. हे हृदयद्रावक दृश्य पाहून उपस्थित अनेकांचे डोळे पाणावले. शवविच्छेदनानंतरही कुटुंबीयांना जवळपास तीन तास रुग्णालयात थांबावे लागले. त्यानंतर मृतदेह काळ्या प्लास्टिकमध्ये गुंडाळून त्यांच्या ताब्यात देण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

यासंदर्भात बोलताना पीडित कुटुंबाने सांगितले की, रुग्णालयात फक्त एकच स्ट्रेचर होते आणि ते आधीपासूनच वापरात होते. त्यामुळे त्यांना कोणतीही मदत मिळाली नाही. अखेर मुलाचा मृतदेह स्वतःलाच कडेवर घेऊन न्यावा लागला. या घटनेमुळे सरकारी आरोग्य व्यवस्थेतील मूलभूत सुविधांवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. स्ट्रेचर आणि रुग्णवाहिकेसारख्या आवश्यक सुविधा वेळेवर उपलब्ध नसतील, तर सर्वसामान्यांना सन्मानाने आरोग्य सेवा कशी मिळणार, असा प्रश्न आता उपस्थित केला जातो आहे.

# २९ जून २०२६ चा स्ट्रॉबेरी मून १०० वर्षांतील सर्वात शक्तिशाली असा दावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** **Strawberry Moon** म्हणजे जून महिन्यात येणाऱ्या पौर्णिमेला दिलेले पारंपरिक नाव आहे.

हे नाव काही आदिवासी संस्कृतींमध्ये वापरले जाते आणि त्याचा चंद्राच्या शक्ती किंवा ऊर्जेशी कोणताही संबंध नाही.

**खरं वास्तव काय आहे?**

पौर्णिमा कधी कधी पृथ्वीच्या जवळ आली तर तिला सुपरमून म्हणतात आणि ती थोडी मोठी व उजळ दिसते.



हवामान, धूळ, आर्द्रता यामुळे चंद्र अधिक आकर्षक दिसू शकतो.

काही खगोलीय स्थितींमुळे चंद्र आकाशात थोडा वेगळ्या उंचीवर दिसतो, पण त्याचा १०० वर्षांतील सर्वात शक्तिशाली असा परिणाम होत नाही.

जून २०२६ साठी असा कोणताही विशेष खगोलीय अपवादात्मक घटना नोंदलेला नाही, ज्यामुळे हा चंद्र इतर पौर्णिमांपेक्षा वेगळा ठरेल.

# दिग्दर्शक स्वरूप सावंत यांच्या 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स'चा फर्स्ट लूक प्रदर्शित; अभिनेत्री दीपाली सय्यद मुख्य भूमिकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** प्रत्येक व्यक्तिरेखा कलाकाराला नव्या रुपात प्रेक्षकांच्या भेटीला येण्याची संधी देत असते. अभिनेत्री नृत्यांगना दीपाली सय्यद यांनी आजवर विविधांगी भूमिका साकारत आपल्या कलागुणांना वाव दिला आहे. आता त्या आणखी एका आव्हानात्मक भूमिकेत दिसणार आहेत. नुकतीच 'महाराष्ट्र एपस्टिन फाईल' या आगामी सिनेमाची घोषणा करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळात भूकंप निर्माण करणाऱ्या घटनांवर प्रकाशझोत टाकणाऱ्या या सिनेमात काही वास्तवातील व्यक्तिरेखाही दिसणार आहेत. यात दीपाली सय्यद मुख्य भूमिका साकारत आहेत. २ ऑक्टोबर २०२६ रोजी हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.

फ्लेमिंगो क्रिएशन आणि मातोश्री एन्टरटेन्मेंट वर्ल्ड प्रस्तुत या चित्रपटाची निर्मिती करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी देवेंद्र भट, सुर्यकांत भुंडे आणि प्रशांत कदमपुरे करीत





आहेत. दिग्दर्शक स्वरूप बी. सावंत दिग्दर्शन करीत आहेत. सध्या या सिनेमाचे चित्रीकरण वेगात सुरू आहे. 'आता सगळं उघड होणार...!' असे म्हणत प्रेक्षकांच्या भेटीला येणाऱ्या 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स'चा फर्स्ट लूक प्रदर्शित करण्यात आला आहे. यामधील दीपाली सय्यद यांचा लूक पाहताक्षणी लक्ष वेधून घेतो. त्यांची व्यक्तिरेखा या सिनेमात अतिशय महत्वाची असून या रुपात पुन्हा एकदा अभिनेत्रीच्या रुपात दीपाली यांच्या अभिनयाचा कस लागणार आहे. दीपाली सय्यद यांच्यासह फर्स्ट लूक मध्ये अभिनेते उदय टिकेकर यांचा समावेश आहे.

# डोनाल्ड ट्रम्प यांच्या आरोग्यावर नवीन पुस्तकातून गंभीर दावा; बैठकींच्या ठिकाणी बदल केल्याचा आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वॉशिंग्टन :** अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आरोग्य आणि कार्यशैलीबाबत नवे दावे समोर आले आहेत. पत्रकार मॅगी हॅबरमन आणि जोनाथन स्वॉन यांच्या **Regime Change : Inside the Imperial Presidency of Donald Trump** या पुस्तकात ट्रम्प यांच्या ऐकण्याच्या (**heaA°ing**) समस्यांमुळे त्यांनी काही अधिकृत बैठका हलविल्याचा आणि त्यांच्या कामकाजावर परिणाम झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

या पुस्तकानुसार, ट्रम्प यांना काही वेळा चर्चेदरम्यान प्रश्न स्पष्ट ऐकू येत नसल्याने ते संभाषणात अडथळे निर्माण होत होते. त्यामुळे काही बैठका अधिक शांत आणि योग्य ध्वनी असलेल्या ठिकाणी हलविण्यात आल्या, असे माजी व्हाइट हाऊस कर्मचाऱ्यांचे निरीक्षण पुस्तकात नमूद आहे. विशेषतः ओव्हल ऑफिसमध्ये अशा बैठकांचे आयोजन केल्याने संवाद अधिक स्पष्ट होईल, असा हेतू असल्याचेही सांगण्यात आले आहे.

पुस्तकात असा दावा आहे की ट्रम्प यांना दीर्घ बैठकींमध्ये थकवा जाणवत असे आणि ते काही वेळा प्रश्न पुन्हा विचारण्यास सांगत असत. यामुळे त्यांच्या शारीरिक क्षमतेबाबत आणि वयोमानानुसार होणाऱ्या बदलांबाबत प्रशासनात अंतर्गत चर्चा सुरू असल्याचेही सूचित करण्यात आले आहे. काही सहाय्यकांनी अनौपचारिकरित्या त्यांच्या ऊर्जा पातळी आणि संवाद क्षमतेबाबत चिंता व्यक्त केली होती, असे पुस्तकात म्हटले आहे.

तथापि, या सर्व दाव्यांना व्हाइट हाऊसकडून तीव्र नकार देण्यात आला आहे. प्रशासनाने हे आरोप अतिरंजित आणि दिशाभूल करणारे असल्याचे सांगत ट्रम्प यांची शारीरिक आणि मानसिक प्रकृती उत्तम असल्याचा दावा केला आहे. अधिकृत निवेदनात असेही म्हटले आहे की माजी राष्ट्राध्यक्षांनी त्यांच्या कार्यकाळात अत्यंत उच्च







ऊर्जा पातळीने काम केले असून कोणत्याही प्रकारची गंभीर आरोग्य समस्या नव्हती.

या पुस्तकामुळे अमेरिकन राजकारणात पुन्हा एकदा ट्रम्प यांच्या आरोग्याविषयी आणि त्यांच्या कार्यपद्धतीविषयी वाद निर्माण झाला आहे. विरोधक आणि टीकाकारांच्या मते, उच्च पदावरील नेत्यांच्या आरोग्याबाबत पारदर्शकता असणे अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण त्याचा थेट परिणाम देशाच्या निर्णय प्रक्रियेवर होतो. तर ट्रम्प समर्थकांच्या मते, हे आरोप राजकीय हेतूने प्रेरित असून त्यांच्या प्रतिमेला धक्का देण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न आहेत.

अमेरिकेत राष्ट्राध्यक्ष पदाची जबाबदारी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. अशा पदावर असलेल्या व्यक्तीच्या शारीरिक आणि मानसिक क्षमतेबाबत सातत्याने चर्चा होत असते. या पार्श्वभूमीवर या पुस्तकातील दावे अधिक चर्चेत आले आहेत. मात्र, अद्याप या दाव्यांना स्वतंत्र वैद्यकीय किंवा अधिकृत पुष्टी मिळालेली नाही. दरम्यान, या पुस्तकात ट्रम्प यांच्या प्रशासनातील इतर अनेक अंतर्गत बाबी, निर्णय प्रक्रिया आणि त्यांच्या नेतृत्व शैलीवरही प्रकाश टाकण्यात आला आहे. काही ठिकाणी त्यांच्या कामकाजातील अनियमितता, अचानक घेतलेले निर्णय आणि सल्लागारांवरील अवलंबित्व यावरही टीका करण्यात आली आहे. एकूणच, हे पुस्तक ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळातील राजकीय आणि प्रशासकीय कारभाराचे वादग्रस्त चित्र मांडते. मात्र, त्यातील आरोग्यविषयक दावे वादग्रस्त असून दोन्ही बाजूंनी वेगवेगळी भूमिका घेतली जात आहे. त्यामुळे या प्रकरणावर पुढील काळात अधिक चर्चा आणि राजकीय प्रतिक्रिया अपेक्षित आहेत.